# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १९१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०३/२०१७

**१) विरुध्द दिशेने येणाऱ्या मोटार सायकल चालकाने मोटार सायकलला धडक दिल्याने जखमी दोन जखमी . :-**

दिनांक १४/०३/२०१७ चे १०.०० ते १०.३० वा. दरम्यान यातील जखमी फिर्यादी हा त्यांचे मोटार सायकल वर मनोज शिक्षक सह वर्ग दहावीची बोर्डाची प्रश्न पत्रीका लाखांदुर वरुन कुडेगाव सेंटरवर घेवुन जात असतांना परसोडी/नाग कडुन येणाऱ्या आरोपी मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल विरुध्द दिशेने भरधाव वेगाने निष्काळजीपने व हयगयीने चालवुन समोरुन येणाऱ्या फिर्यादीचे मोटार सायकला जबर धडक दिल्याने त्याचे सोबत असलेल्या इसमास व फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी केशव गोवींदाजी शहारे वय ३३ वर्ष, रा. लाखांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९, ३३७, ३३८ भांदवि. सहकलम १८४,१८५ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मुंजुमकर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) जळाल्याने औषधोपचारा दरम्यान मुलीचा मृत्यु . :-**

दिनांक १३/०३/२०१७ चे १५.३५ वा. दरम्यान यातील मृतक कु. दिक्षा गौतम रामटेके वय १७ वर्ष, रा. मांगली जात महार ही ९५ टक्के जळाल्याने तीला औषधोपचारा कामी सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. बिसने पोस्टे पवनी यांनी कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

**३) छातीत दुखत असल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :-**

दिनांक १४/०३/२०१७ चे २०.३० वा. दरम्यान यातील मृतक स्वप्नील श्यामसुंदर चिन्नावर वय ३५ वर्ष, रा. चंद्रपुर व त्यांची पत्नी सौ. सुजाता असे मिळुन दोघेही नागपुर वरुन शिवनाथ एक्सप्रेसने रायपुरला जाण्यास निघाले असता वरठीचे समोर मृतकची छाती दुखत असल्यान ट्रेनमध्ये खाली पडला व बेशुध्द झाला त्यास तुमसर रोड रेल्वे येथील प्राथमीक आरोग्य तुमसर येथे प्रथम उपचार करुन पुढील उपचारा करीता सु.बो दवाखाना तुमसर येथे नेले असता तेथील डॉक्टरने तपासुन मृतक घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन सरतर्फे फिर्यादी सपोनी. जाधव यांनी १७४ जाफौ. चा मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास परीपोउपनी. जाधव पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे.

**४) अचानक प्रकृती बिघडल्याने औषधोपचार दरम्यान इसमाचा मृत्यु . :-**

दिनांक १४/०३/२०१७ चे ९.२० वा. दरम्यान यातील मृतक विजयकुमार मधुकर लांजेवार वय ४१ वर्ष, रा. पेट्रलपंप ठाणा याची दिनांक १४/०३/२०१७ चे ८.२० वा. अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. लांजेवार पोस्टे जवाहरनगर यांनी कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहे.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-**

दिनांक १४/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती २१ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.